पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-४११ ०१८.
मा.स्थायी समिती
कार्यपत्रिका क्रमांक – ७९
<u>सभावृत्तांत</u>

दिनांक - २४/०९/२०१३ वेळ - सकाळी ११.00 वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक २४/०९/२०१३ रोजी सकाळी ११.00 वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा.जगताप नवनाथ दत्तु - सभापती
२) मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
३) मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
४) मा.छाया जगन्नाथ साबळे
५) मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
६) मा.भालेकर अरुणा दिलीप
७) मा.वाघेरे सुनिता राजेश
८) मा.महेशदादा किसन लांडगे
९) मा.बारणे माया संतोष
१०) मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
११) मा.लोंढे गणेश नारायण
१२) मा.कदम सदगुरु महादेव
१३) मा.भोंडवे संगिता राजेंद्र
१४) मा.शेंडगे आशा सुखदेव

याशिवाय मा.श्रीकर परदेशी – मा.आयुक्त,मा.तानाजी शिंदे - अति.आयुक्त, मा.टेकाळे - मा.गायकवाड, मा.खांडकेकर, मा.दुरगुडे, मा.कुलकर्णी, मा.ढेरे, मा.माछरे,मा.फुंदे – सहा.आयुक्त, मा.घाडगे – मुख्यलेखापरीक्षक, मा.गावडे – नगरसचिव, मा.कांबळे – प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे – विकास अभियंता,मा.चव्हाण - सह शहर अभियंता, मा.डॉ.रॉय – प्र.आरोग्य वैद्य.अधिकारी, मा.डॉ.देशमुख – वैद्यकिय अधिक्षक,मा.पवन सावळे – अति.वैद्य.अधिकारी, मा.निकम,मा.दुधेकर, मा.काची, मा.जाधव, मा.चव्हाण, मा.कपिले,मा.थोरात,मा.पठाण,मा.चिंचवडे, मा.साळवी, मा.लडकत,मा.कुलकर्णी, मा.पिरजादे, मा.दांगट, मा.बरशेट्टी, - कार्यकारी अभियंता, मा.डॉ.गोरे – पशुवैद्यकीय अधिकारी, मा.चव्हाण – आरोग्य कार्यकारी अधिकारी, मा. शिंपी - नगररचनाकार हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------

<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले :-</u>

विषय क्र.१५) समन्वयक भुसंपादन अधिकारी अभिनामाचे पद मानधनावर नियुक्ती करणेबाबत..

विषय क्र. १६) asci व्दारा आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमाबाबत..

विषय क्र. १७) ठराव क्र.४१०० मध्ये दुरुस्ती करणेबाबत..मा.माया बारणे,मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव..

विषय क्र. १८) ठराव क्र.४०९१ रद्द करणेबाबत..मा.माया बारणे,मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव..

विषय क्र. १९) श्री.राजेंद्र गडकरी यांची मनपा विकास कामासाठी आ र्किटेक्ट म्हणुन नेमणुक करणेबाबत.. मा. विनया तापकीर,मा.माया बारणे यांचा प्रस्ताव..

विषय क्र. २०) सन २०१३ – १४ च्या अर्थसंकल्पातील ब प्रभागातील कामांच्या तरतुदींमध्ये फेरबदल करणेबाबत..मा.माया बारणे,मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव..

विषय क्र. २१) ब मुख्यालयाकडील सन २०१३ – १४ च्या अंदाजपत्रकातील स्थापत्य विकास कामांच्या तरतुदीमध्ये वाढ घट करणेबाबत..मा.माया बारणे,मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव..

विषय क्र. २२) सन २०१३ – १४ च्या अर्थसंकल्पातील ड प्रभाग व ड मुख्यालयातील कामांच्या तरतुदी मध्ये फेरबदल करणेबाबत.. मा.माया बारणे,मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव..

विषय क्र. २३) सन २०१३ – १४ च्या अर्थसंकल्पातील ड प्रभाग व ड मुख्यालयातील कामांच्या तरतुदी मध्ये फेरबदल करणेबाबत..मा.शकुंतला धराडे,मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव..

विषय क्र. २४) ब प्रभागातील कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत..मा.शकुंतला धराडे,मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव..

विषय क्र. २५) ब प्रभागातील सन २०१३ – १४ च्या मुळ अंदाजपत्रकातील स्थापत्य विकास कामांच्या तरतुदींमध्ये वाढ घट करणेबाबत..मा.शकुंतला धराडे,मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव.
.

विषय क्र. २६) प्रस्तावात नमुद प्रमाणे वाढ घट करण्यास मंजुरी देणेबाबत..मा.अरुणा भालेकर,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव..

विषय क्र. २७) अ प्रभागातील सन २०१३ – १४ चा मुळ अंदाजपत्रकातील स्थापत्य विषयक विकास कामाच्या तरतुदीमध्ये वाढ घट करणेबाबत..मा.शकुंतला धराडे,मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव..

विषय क्र. २८) सन २०१३ – १४ चे अंदाजपत्रक तरतुद वर्ग करणेबाबत..मा.शकुंतला धराडे,मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव..

विषय क्र. २९) सन २०१३ – १४ च्या अर्थसंकल्पातील ब प्रभागातील कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत..मा.शकुंतला धराडे,मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव..

विषय क्र. ३०) प्रस्तावात नमुद प्रमाणे तरतुद वर्गीकरणास मान्यता देणेबाबत..मा.शकुंतला धराडे,मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव..

विषय क्र. ३१) ब प्रभागांतर्गत सार्वजनिक गणेश विसर्जनाच्या ठिकाणी तसेच स्वागत कक्षाच्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात सी.सी.टी.व्ही,ध्वनीक्षेपण व प्रकाश व्यवस्था करणेबाबत..

विषय क्र. ३२) चिंचवड येथील कै.वस्ताद मुरलीधर माचुत्रे व्यायामशाळा सेवाशुल्क तत्वावर चालविणेस देणेबाबत..मा.गणेश लोंढे,मा.चंद्रकांत वाळके यांचा प्रस्ताव..

------------

ठराव क्रमांक – ४१५९ विषय क्रमांक – १
दिनांक – २४/९/२०१३ विभाग – पाणीपुरवठा
सुचक – मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक – मा.संगिता भोंडवे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.पापु/६/कावि/७२४/२०१३दि.१३/०८/२०१३
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.६/४२/२०१२-१३ मधील अ.क्र.४२ अन्वये, पिंपरी-चिंचवड शहरातील विविध प्रभागातील पाण्याची गळती शोधण्यासाठीची यंत्रणा खरेदी करणेकामी मे.सुएझ एनव्हायरमेंट इंडिया प्रा.लि. (नि.र.रु.१,४०,४२,२३२/- (अक्षरी र.रु.एक कोटी चाळीस लाख बेचाळीस हजार दोनशे बत्तीस) पेक्षा ०.०२ % कमी) या ठेकेदाराबरोबर वरील कामाचा करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१६० विषय क्रमांक – २
दिनांक – २४/९/२०१३ विभाग – पाणीपुरवठा
सुचक – मा.छाया साबळे अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.पापु/६/कावि/७३९/२०१३दि.१६/०८/२०१३
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.६/४२/२०१२-१३ मधील अ.क्र.३२ अन्वये, पिंपरी-चिंचवड शहरातील अ व ब प्रभागातील वितरण व्यवस्थेतील पाण्याची गळती हेलियम गॅस यंत्रणेव्दारे शोधणे व गळती थांबविणे व तद् अनुषंगिक कामे करणेकामी मे.सुएझ एनव्हायरमेंट इंडिया प्रा.लि. (नि.र.रु. २,८०,१०,९३३/- (अक्षरी र.रु.दोन कोटी ऐंशी लाख दहा हजार नऊशे तेहतीस) पेक्षा ४.०० % जादा (चालू दरसुचीनुसार) ०.५१ % कमी) या ठेकेदाराबरोबर वरील कामाचा करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१६१ विषय क्रमांक – ३

दिनांक – २४/९/२०१३ विभाग – वाहनदुरुस्ती कार्यशाळा

सुचक – मा.महेशदादा लांडगे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे

संदर्भः- मा.सह शहर अभियंता यांचे जा. क्र.काशा/भां/कावि/३१०/२०१३दि.१९/०८/२०१३

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाकडील ३१ वाहनांचा लिलाव करणेकामी मध्यवर्ती भांडार यांनी निश्चित केलेल्या मे.ए.ए.ऑक्शनर्स अँन्ड कॉन्ट्रक्टर कोहिनूर सोसायटी साकी नाका, मुबंई-७२ यांची लिलावदार म्हणून एजन्सी निश्चित करणेस व त्याप्रमाणे लिलाव कमिशन एजन्सीचे दर ०.८८ % नुसार येणारी रक्कम अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१६२ विषय क्रमांक – ४

दिनांक – २४/९/२०१३ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.सुषमा तनपुरे

संदर्भः- मा.शहर अभियंता यांचे जा. क्र.स्था/नि/२ब/कावि/३६५/२०१३दि.२०/०८/२०१३

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२८/२०१२-१३ मधील अ.क्र.७ अन्वये, वॉर्ड क्र.६२ सावरकर उद्यानात स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.औंकार एंटरप्रायझेस (नि.र.रू.८,६७,६२२/- [अक्षरी र.रू.आठ लाख सदुसष्ट हजार सहाशे बावीस] पेक्षा २५.०२ % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रू.६,८३,०७०/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे बाजारभावानुसार मटोरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधी मध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर कामाचा करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१६३ विषय क्रमांक – ५

दिनांक – २४/९/२०१३ विभाग – प्रशासन

सुचक – मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक – मा.महेशदादा लांडगे

संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.प्रशा/५/कावि/९२६/२०१३दि.१६/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रशासन अधिकारी व आया पदासाठी घेणेत येणा-या लेखी स्पर्धा परीक्षेकरिता मे.झील टेक् सर्व्हीसेस, कोथरुड, पुणे यांचेकडून ओएमआर उत्तरपत्रिका छपाई करुन घेणेस तसेच मशीनवर उत्तरपत्रिका तपासणीचे काम थेट पध्दतीने करुन घेणेस व त्याकरिता येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. (अंदाजे खर्च र.रू.३२,१०८/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१६४ | विषय क्रमांक – ६

दिनांक – २४/९/२०१३ | विभाग – पशुवैद्यकिय

सुचक – मा.सदगुरु कदम | अनुमोदक – मा.गणेश लोंढे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.पवै/०१/कावि/९३/२०१३दि.११/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मे.महर्षी वाल्मिकी स्वंयरोजगार सहकारी संस्था ,थेरगांव पुणे-३३. यांची किमान वेतन दराने १२ कर्मचारी मोकाट जनावरे (कुत्री सोडुन) डुकरे पकडणे, दैनंदिन कत्तलखाना, कोंडवाडा तसेच डॉग शेड ठिकाणी साफ सफाई व स्वच्छता करणे इत्यादी दैनदिन कामकाज करण्यासाठी उपलब्ध करुन ६ महिने कालावधी करीता कामकाज करुन घेणेस व याकामी येणा-या १२ कर्मचा-याकरीता एकूण र.रु.७,४९,३३१=३६ सर्व्हिस टॅक्स व चार्जेससहचे प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१६५ | विषय क्रमांक – ७

दिनांक – २४/९/२०१३ | विभाग – नगरसचिव

सुचक – मा.आशा शेंडगे | अनुमोदक – मा.विनया तापकीर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.नस/०३/कावि/१८२/२०१३दि.१६/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.महापौर यांचे वापरातील म.न.पा. वाहन क्रं. MH-14- AS/7 (करोला) करीता पाच नग नविन ब्रिजस्टोन कंपनीचे टयूबलेस टायर्स मे.दर्शन टायर्स चिंचवड यांच्याकडून करारनामा न करता थेट पध्दतीने त्यांनी सादर केलेल्या दरपत्रकानुसार खरेदी करणेस व त्याकामी येणारे र.रू.२७,७५०/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१६६ | विषय क्रमांक – ८

दिनांक – २४/९/२०१३ | विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.सुनिता वाघेरे | अनुमोदक – मा.सुषमा तनपुरे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.मभां/५/कावि/७०४/२०१३दि.१३/०९/२०१३

विषय :- मनपाचे विविध विभागासाठी एच.पी.कंपनीचे टोनर खरेदीबाबत..

मा.आयुक्त यांना त्यांचे विषय क्र.८ वरील विषयपत्र मागे घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१६७ | विषय क्रमांक – ९

दिनांक – २४/९/२०१३ | विभाग – करसंकलन

सुचक – मा.सुषमा तनपुरे | अनुमोदक – मा.अरुणा भालेकर

संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.कर/१/कावि/१५३८/२०१३दि.१६/०९/२०१३

विषय :- डेटा एन्ट्री ऑपरेटर घेणेबाबत..

मा.आयुक्त यांना त्यांचे विषय क्रमांक ९ वरील विषयपत्र मागे घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१६८ विषय क्रमांक – १०

दिनांक – २४/९/२०१३ विभाग – अ प्रभाग

सुचक – मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक – मा.माया बारणे

संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.अप्र/स्था/३/१७७९/२०१३दि.७/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड शहराची औदयोगिक नगरी तसेच शैक्षणिक नगरी म्हणून ओळख आहे, त्यामुळे शहरात मोठया प्रमाणात नागरीवस्तीत वाढ होत आहे. शहरात राहणा-या नागरिकांसाठी मुलभुत गरजा व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधांचा पुरविण्यासाठी शहरातील मोकळया जागांच्या विकास करून प्रत्येक प्रभागात प्रत्येक वॉर्डात एक वॉर्ड सेंटर उभारणेचा मा.आयुक्तसाहेब यांनी मानस व्यक्त केला व त्यानुसार पहिला वर्षी प्रत्येक प्रभागातील ५ वॉर्डाची जागेच्या उपलब्धतेनुसार निवड करणेच्या दि.२२/०३/२०१३ रोजीच्या बैठकीत निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार कामाची व्याप्ती व स्वरूप पहाता मुंबई स्थित आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त आर्किटेक्ट मे. पी.के.दास ऍण्ड असो. यांची नेमणूक करणे योग्य होईल. सदर कामासाठी मनपाच्या सन २०१३ -१४ च्या अंदाजपत्रकात ५) इमारत योजना या लेखाशिर्षाखाली पान क्र. १२१ वर अ.क्र ३४ अन्वये रक्कम रू. १,००,००,०००/- इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच या कामासाठी वास्तूविशारद नेमणूक करणेसाठी अ.क्र. ३५ अन्वये रक्कम रू.५,५०,०००/- इतकी तरतूद करणेत आलेली आहे. तरी उपरोक्त मुद्यांचा विचार करून, सदर प्रकल्पाचे नियोजन करणे व आराखडे तयार करणेसाठी आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त आर्किटेक्ट मे.पी.के.दास अँड असो. यांची नेमणुक करणेस तसेच त्याकामी मनपाच्या अटी शर्तीनुसार अदा करावयाच्या फी खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१६९ विषय क्रमांक – ११

दिनांक – २४/९/२०१३ विभाग – जलनि:सारण

सुचक – मा.छाया साबळे अनुमोदक – मा.महेशदादा लांडगे

संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.जनि/२/कावि/६९९/२०१३दि.१६/०९/२०१३

विषय :- निविदा नोटीस क्र.१/१०/२०१३-१४ मधील अ.क्र.४ वरील कामाचा करारनामा करणेस मंजुरी मिळणेबाबत..

विषय क्रमांक ११ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१७० विषय क्रमांक – १२

दिनांक – २४/९/२०१३ विभाग – दूरसंचार

सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.सुषमा तनपुरे

संदर्भः- मा.अति.आयुक्त यांचे जा.क्र.दूरसंचार/३/कावि/८६/२०१३दि.११/०९/२०१३

विषय :- तरतुद वर्ग करणेबाबत..

मा.आयुक्त यांना त्यांचे विषय क्रमांक १२ वरील विषयपत्र मागे घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१७१ | विषय क्रमांक – १३
दिनांक – २४/९/२०१३ | विभाग – पाणीपुरवठा व जलनि:सारण
सुचक – मा.चंद्रकांत वाळके | अनुमोदक – मा.महेशदादा लांडगे

संदर्भ:- मा.सह शहर अभियंता यांचे जा.क्र.पापु/७/कावि/४७६/२०१३दि.१७/०९/२०१३

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

Indian Infrastructure, New Delhiया संस्थेने Second Annual conference on “Sewage treatment Plants” या विषयावर दिल्ली येथे दिनांक १७/१०/२०१३ व १८/१०/२०१३ अखेर कॉन्फरन्स आयोजित केलेली असुन सदर कॉन्फरन्सला जलनि:सारण विभागाकडील “सह शहर अभियंता” श्री.चव्हाण ए.व्ही. “कार्यकारी अभियंता” श्री.निकम एम.डी. तसेच पर्यावरण विभागातील “कार्यकारी अभियंता” श्री कुलकर्णी संजय यांना उपस्थित रहाणेकामी मा.आयुक्त साहेब यांनी दिनांक २/०९/२०१३ रोजी आदेशित केले आहे. सदर कॉन्फरन्सचे एकूण शुल्क र.रू १६,८५४/- असुन कॉन्फरन्सला उपस्थित राहणेकामी पुणे ते दिल्ली व दिल्ली ते पुणे विमानाने प्रवास करणेस मा आयुक्त सो यांनी दिनांक १३/०९/२०१३ च्या मंजुर प्रस्तावा नुसार मान्यता दिलेली आहे. सदरचे विमान प्रवास खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१७२ | विषय क्रमांक – १४
दिनांक – २४/९/२०१३ | विभाग – स्थापत्य
सुचक – मा.माया बारणे | अनुमोदक – मा.गणेश लोंढे

संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/२ब/कावि/३६९/२०१३दि.१७/०९/२०१३

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२१/२०१२-१३ मधील अ.क्र.१६ अन्वये, प्र.क्र.३१ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रिडा संकुलामध्ये उर्वरित ठिकाणी प्रेक्षक गॅलरी बांधणेकामी मे.श्री.गणेश कंन्स्ट्रक्शन (LFC) (नि.र.रु.१८,६७,२८४/-(अक्षरी र.रु.अठरा लाख सदुसष्ट हजार दोनशे चौ-याऐंशी) पेक्षा २४.५०% कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१४,८०,२८९/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.</u>

ठराव क्रमांक – ४१७३ विषय क्रमांक – १५
दिनांक – २४/९/२०१३ विभाग – नगरविकास
सुचक – मा.माया बारणे अनुमोदक – मा.आशा शेंडगे
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/आ-२/६५७/२०१३दि.२०/०९/२०१३
मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नगररचना व विकास विभागात समन्वयक भुसंपादन अभिनामाचे १ पद दरमहा र.रु. ३०,०००/- एकत्रित मानधनावर ६ महिने कालावधीसाठी श्री शरद विनायक नाईक यांना नियुक्तीबाबत यापुर्वी मा.स्थायी समिती ठराव क्र.८९१ दि.१४/०८/२०१२ व स्थायी समिती ठराव क्र.२९४२ दि.२६/२/२०१३ अन्वये मंजुरी घेणेत आलेली होती. सदरची मुदत दि.१/९/२०१३ रोजी संपुष्टात येत असलेने व श्री शरद विनायक नाईक यांचे कामकाजाची महानगरपालिकेस आवश्यकता असल्याने त्यांना एक दिवसाचा ब्रेक देऊन दि.३/९/२०१३ पासुन दि.२/३/२०१४ कालावधी करिता दरमहा र.रु. ३०००० एकत्रित मानधनावर नियुक्तीकामी शिफारस करण्यात आली आहे. याकामी ६ महिने कालावधीसाठी र.रु. १,८०,०००/- इतका खर्च येणार आहे. सबब श्री शरद विनायक नाईक यांना दरमहा र.रु.३०,०००/- एकत्रित मानधनावर समन्वयक भुसंपादन अधिकारी या पदावर ६ महिने कालावधीसाठी नियुक्ती करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१७४ विषय क्रमांक – १६
दिनांक – २४/९/२०१३ विभाग – पाणीपुरवठा
सुचक – मा.माया बारणे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जशुके/पापु/२०१३दि.२४/०९/२०१३
मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

Change Management for achieving continuous water supply for all in Urban Areas या विषयावर दिनांक १७ ऑक्टोबर २०१३ ते २६ ऑक्टोबर २०१३ या कालावधीत हैदराबाद व इस्त्रायल या देशातील जेरुसलेम व तेल अवीव या शहरात आंतरराष्ट्रीय प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याबाबत आस्की या संस्थेने उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये कळविले आहे. सदर प्रशिक्षण कार्यक्रमास महापालिकेतील पदाधिकारी व अधिकारी यांना सहभागी होणेबाबत त्यांनी आमंत्रित केलेले आहे. सदर प्रशिक्षण कार्यक्रमाचे शुल्क र.रु. २,२५,०००/- अधिक १२.३६% सेवा कर (एकुण र.रु. २,५२,८१०/-) प्रति व्यक्ती इतके कळविलेले आहे. सदर प्रशिक्षण कार्यक्रमास उपस्थित राहणा-या अधिकारी यांची नावे खालीलप्रमाणे आहेत. सदर प्रशिक्षण कार्यक्रमास उपस्थित राहणा-या दोन सन्माननीय पदाधिकारी यांची नावे मा.महापौर/स्थायी समिती सुचवतील त्यानुसार निश्चीत करण्यात येतील.

१) श्री.शरद दादाभाऊ जाधव - कार्यकारी अभियंता,पाणीपुरवठा
२) श्री.सुनिल ऐंशीराम भागवानी - उप अभियंता,पाणीपुरवठा

३) श्री.प्रसाद पांडुरंग देशमुख - कनिष्ठ अभियंता,पाणीपुरवठा

सदर प्रशिक्षण कार्यक्रमास उपस्थित राहणा-या उपरोक्त पदाधिकारी व अधिकारी यांच्या र.रु. १२,६४,०५०/- मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१७५ विषय क्रमांक – १७

दिनांक – २४/९/२०१३

सुचक – मा.माया बारणे अनुमोदक – मा.संगिता भोंडवे

संदर्भ:- मा.माया बारणे,मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव..

मा.स्थायी समिती ठराव क्र.४१०० दिनांक १०/०९/२०१३ रोजी नुसार "मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येत आहे." हा मजकुर वगळण्यात यावा व त्याऐवजी "महाराष्ट्र शासनाचे (जिल्हाधिकारी) यांचे पुढील आदेश येईपर्यंत सदर नागरिक सुविधा केंद्र चालविण्यास मान्यता देणेत येत आहे." हा मजकुर समाविष्ट करण्याची दुरुस्ती करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१७६ विषय क्रमांक – १८

दिनांक – २४/९/२०१३

सुचक – मा.माया बारणे अनुमोदक – मा.संगिता भोंडवे

संदर्भ:- मा.माया बारणे,मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव..

मा.स्थायी समिती ठराव क्र.४०९१ दिनांक १०/०९/२०१३ रद्द करण्यात यावा व मा.आयुक्त यांचे जा.क्र.वैद्य/१/कावि/८२९/२०१३ दिनांक १६/०८/२०१३ नुसार कार्यवाही करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१७७ विषय क्रमांक – १९

दिनांक – २४/९/२०१३

सुचक – मा.विनया तापकीर अनुमोदक – मा. माया बारणे

संदर्भ:- मा.विनया तापकीर,मा.माया बारणे यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड मनपाच्या अंदाजपत्रकातील स्थापत्य विषयक विकास कामे करणेसाठी मे.राजेंद्र गडकरी, पुणे यांचा यापुर्वीचा आर्किटेक्ट कामाचा अनुभव विचारात घेवुन त्यांची मनपाच्या कामासाठी नेमणुक करणेस व त्यापोटी त्यांना कॉन्सील ऑफ आर्किटेक्ट, नवी दिल्ली यांचे नियमावलीनुसार फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१७८ विषय क्रमांक – २०

दिनांक – २४/९/२०१३

सुचक – मा.माया बारणे अनुमोदक – मा.संगिता भोंडवे

संदर्भ:- मा.माया बारणे,मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव..

ब प्रभागामध्ये सन २०१३ – १४ त्या अंदाजपत्रकामध्ये कामांच्या तरतुदींमध्ये फेरबदल करावयाचा आहे. तरी प्रस्तावात नमुद प्रमाणे बदल होणेस मान्यता देणेत येत आहे.(वाढ/घट र.रु.३५,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१७९ विषय क्रमांक – २१

दिनांक – २४/९/२०१३

सुचक – मा.माया बारणे अनुमोदक – मा.संगिता भोंडवे

संदर्भ:- मा.माया बारणे,मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव..

ब मुख्यालयाकडील सन २०१३ – १४ च्या मुळ अंदाजपत्रकातील स्थापत्य विकास कामांच्या तरतुदींमध्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे वाढ घट करणेस मान्यता देणेत येत आहे.
(वाढ/घट र.रु.४,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१८० विषय क्रमांक – २२

दिनांक – २४/९/२०१३

सुचक – मा.माया बारणे अनुमोदक – मा.संगिता भोंडवे

संदर्भ:- मा.माया बारणे,मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव..

ड प्रभाग व ड मुख्यालयामध्ये सन २०१३- १४ च्या अंदाजामध्ये कामाच्या तरतुदीमध्ये फेरबदल करावयाचा आहे. तरी प्रस्तावात नमुद प्रमाणे फेरबदल होणेस मान्यता देणेत येत आहे.
(वाढ/घट र.रु. १०,४०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१८१ विषय क्रमांक – २३

दिनांक – २४/९/२०१३

सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक – मा.संगिता भोंडवे

संदर्भ:- मा.शकुंतला धराडे,मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव..

ड प्रभाग व ड मुख्यालयामध्ये सन २०१३- १४ च्या अंदाजामध्ये कामाच्या तरतुदीमध्ये फेरबदल करावयाचा आहे. तरी प्रस्तावात नमुद प्रमाणे फेरबदल होणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.१०,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१८२ विषय क्रमांक – २४

दिनांक – २४/९/२०१३

सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक – मा.विनया तापकीर

संदर्भ:- मा.शकुंतला धराडे,मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव..

ब प्रभागामध्ये सन २०१३ – १४ च्या अंदाजपत्रकामध्ये कामांच्या तरतुदींमध्ये फेरबदल करावयाचा आहे, तरी प्रस्तावात नमुद प्रमाणे बदल होणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.१०,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१८३ विषय क्रमांक – २५

दिनांक – २४/९/२०१३

सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक – मा.विनया तापकीर

संदर्भ:- मा.शकुंतला धराडे,मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव..

ब प्रभागातील सन २०१३ – १४ च्या मुळ अंदाजपत्रकातील स्थापत्य विकास कामांच्या तरतुदींमध्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे वाढ घट करणेस मान्यता देणेत येत आहे.(वाढ/घट र.रु ५०,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१८४ विषय क्रमांक – २६

दिनांक – २४/९/२०१३

सुचक – मा. शकुंतला धराडे अनुमोदक – मा. विनया तापकीर

संदर्भ:- मा.शकुंतला धराडे,मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव..

अ प्रभागातील सन २०१३ – १४ च्या मुळ अंदाजपत्रकातील प्रस्तावात नमुद स्थापत्य विषयक विकास कामांच्या तरतुदींमध्ये वाढ घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.१,७०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१८५ विषय क्रमांक – २७

दिनांक – २४/९/२०१३

सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक – मा.विनया तापकीर

संदर्भ:- मा.शकुंतला धराडे,मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव..

ब प्रभागातील सन २०१३ – १४ चा मुळ अंदाजपत्रकातील स्थापत्य विकास कामांच्या प्रस्तावात नमुद तरतुदींमध्ये वाढ घट करणेस मान्यता देणेत येत आहे.(वाढ/घट र.रु.५,००,०००/-

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१८६ विषय क्रमांक – २८

दिनांक – २४/९/२०१३

सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक – मा.विनया तापकीर

संदर्भ:- मा.शकुंतला धराडे,मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव..

महानगरपालिकेच्या सन २०१२ – १३ चे अंदाजपत्रकामधील प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे तरतुद वर्गीकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे. सदर ठराव कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी. (वाढ/घट र.रु.११,७०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१८७ विषय क्रमांक – २९
दिनांक – २४/९/२०१३
सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक – मा.विनया तापकीर
संदर्भः- मा.शकुंतला धराडे,मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव..

ब प्रभागामध्ये सन २०१३ – १४ चे अंदाजपत्रकामधे कामांच्या तरतुदींमध्ये प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे फेरबदल करण्यास मान्यता देणेत येत आहे.(वाढ/घट र.रु.६६,९०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१८८ विषय क्रमांक – ३०
दिनांक – २४/९/२०१३
सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक – मा.विनया तापकीर
संदर्भः- मा.शकुंतला धराडे,मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव..

प्रभाग क्रमांक २१ मधील कामामध्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.६४,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१८९ विषय क्रमांक – ३१
दिनांक – २४/९/२०१३ विभाग – ब प्रभाग
सुचक – मा.माया बारणे अनुमोदक – मा.गणेश लोंढे
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.बप्र/वि/जा/५७८/२०१३ दि.१७/०९/२०१३

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

ब प्रभाग अंतर्गत सार्वजनिक श्री गणेश विसर्जनाच्या ठिकाणी तसेच स्वागत कक्षाच्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात सी सी टी व्ही, ध्वनीक्षेपण व प्रकाश व्यवस्था करणे हे काम अंदाजपत्रकीय र.रु. ४८१९४३/- निविदा नोटीस क्र.२/१५८-१२/१३ प्रमाणेच पुर्व स्विकृत दर १२.५०% कमी प्रमाणे म्हणजेच र.रु.४२१७००/- (अक्षरी र.रु.चार लाख एकवीस हजार सातशे फक्त) इतक्या रकमेच्या खर्चास व सदरचे काम निविदा न मागविता मे.मोरया मंडप डेको.यांचेकडुन थेट पध्दतीने करुन घेणेस व त्याप्रमाणे बील अदायगी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१९० विषय क्रमांक – ३२
दिनांक – २४/९/२०१३
सुचक – मा.गणेश लोंढे अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके
संदर्भः- मा.गणेश लोंढे,मा.चंद्रकांत वाळके यांचा प्रस्ताव..

चिंचवड तालेरा हॉस्पिटल जवळील कै.वस्ताद मुरलीधर माचुत्रे व्यायामशाळा ,तालेरानगर, चिंचवड ही व्यायामशाळा जय मातृभुमी युवा मंचास योग्य त्या सेवाशुल्क तत्वावर तीन वर्षे कालावधीस देखभाल संरक्षण व चालन कामी देण्यास व त्याकामी करारनामा करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा. सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(जगताप नवनाथ दत्तु)
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/४/कावि/९०१/२०१३
दिनांक - २६/०९/२०१३.

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.